**Prabhat, August 18, 2011**

# विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा

पुणे, दि. १७ (प्रतिनिधी)- इयत्ता आठवी ते बारावीतील विद्यार्थ्यांसाठी टीसीएस आयटी विझ २०११ ही तंत्रज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. शाळांकरता आयोजित केली जाणारी ही सर्वात मोठी प्रश्नमंजुषा आहे.

विभागीय स्तरावरील विजेत्या १२ संघांचा समावेश अंतिम फेरीमध्ये होणार आहे. एका संघामध्ये दोनच स्पर्धक असणे आवश्यक असणार आहे. ही स्पर्धा पुण्यात कोथरुड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार आहे. शालेय संस्थेमध्ये याबाबत विद्यार्थ्यांनी नोंदणी करावयाची आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी कुठलेही प्रवेश शुल्क असणार नाही.